# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला उस्मानपुरा,
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


परिपत्रक/तात्काळ कालमर्यादा

जावक क्र.विकाऔ/लेखा-१/२०१७/३५०४
दि. 21 SEP 2017

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद/जालना/अंबड,जि.जालना/जिंतूर जि.परभणी/नांदेड/हिंगोली/उस्मानाबाद/बीड
पु.ला.शासकीय तंत्रनिकेतन, औसा रोड,लातूर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,बार्शी रोड लातूर.

**विषयः- अखर्चित असलेल्या भारत सरकार शिष्यवृत्ती व इतर शिष्यवृत्त्या बाबतची माहिती पाठविणे बाबत.**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, संस्थेच्या प्राचार्य यांच्या वैयक्तिक लेखा खाते व बँक खात्यावर शिल्लक असलेल्या शासनाच्या विविध शिष्यवृत्या (समाज कल्याण विभाग/ आदिवासी विभाग विभाग/ अपंग शिष्यवृत्ती/ अल्पसंख्यांक विभाग शिष्यवृत्ती/ खुल्या प्रवर्ग शिष्यवृत्ती इत्यादी) **३१ मार्च, २०१६, ३१ मार्च,२०१७ व ३१ ऑगस्ट,२०१७** पर्यंतच्या शिल्लक असलेल्या/ वितरीत न झालेल्या शिष्यवृत्तीचे वर्षनिहाय माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावी.

**तसेच उपरोक्त शिष्यवृत्यांची शिल्लक असलेली/वितरीत न झालेली रक्कम संबंधितास अदा करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा दि.३०-०९-२०१७ अखेरचा अहवाल या कार्यालयास दि.०५-१०-२०१७ पर्यंत सादर करावा.**

सदरील शिल्लक असलेली / वितरीत न झालेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेबाबत शासनाकडून संबधित संस्थेच्या प्राचार्य/ संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो याची नोंद घेण्यात यावी. व त्यादृष्टीने प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून तात्काळ प्रथम प्राध्यान्याने रकमा संवितरीत करण्याची कार्यवाही करावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.